जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- २५.८.९४

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग],
जिल्हा परिषद——— पुणे-११

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस-११९४/(७९५१) प्राशि-३ दिनांक २०.५.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९३ पासुन इ. १ली ते सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु ~~करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर~~ "खास बाब" म्हणुन परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| रयत शिक्षण संस्था, सातारा | प्राथमिक विद्यामंदीर, औंधगांव पुणे. | जुन १९९३ पासून इ. १ली ते शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी फक्त एका तुकडीस | मराठी |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकुल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३. शाळेत, शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्याव सेवाशर्तींच्या अधिन राहुन नेमला पाहिजे.

..२..

मुख्याध्यापक
रयत शिक्षण संस्थेचे
प्राथमिक विद्या मंदिर
औंधगाव, पुणे-७

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थितीव संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६. संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंद वहया अद्ययावत आणि विश्वसाई स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षकानुकुल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे कार्यपध्दतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज समक्ष क्षेत्रिय अधिका-याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षा-नंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.०० इंग्रजीमाध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी रु. २५०००/-[रु. पंचवीस हजार फक्त]अनामत रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्ण खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

..३..